# आंतरराष्ट्रीय विद्येची देवता मातेश्वरी जगदंबा सरस्वती : राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी

धर्मग्रंथात लिहिल्याप्रमाणे मातेश्वरी जगदंबा सरस्वतीचे स्मरण जगाला आदिदेवीच्या रूपाने केले जाते. वेदांमध्ये सरस्वतीला विद्येची देवी म्हटले आहे. आता आपल्याला माहित आहे की, सरस्वती जगदंबा ही प्रजापिता ब्रह्माची कन्या आहे, जिच्याद्वारे परमात्मा सर्वांच्या इच्छा पूर्ण करतो. त्यामुळे जगदंबेची पूजा केली जाते. निराकार परमात्मा हा जगदंबेद्वारे सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारा आहे. ज्याची सर्वात जास्त पूजा केली जाते अशा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पहिल्या मुख्य प्रशासिका मातेश्वरी जगदंबा सरस्वतीजी उर्फ मम्मा यांचा आज ६० वा स्मृतिदिन "आध्यात्मिक ज्ञान दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने त्यांचा आध्यात्मिक प्रवास जाणून घेऊया....

जे मम्मासोबत राहिले, तिचे गुण ओळखले आणि मम्माच्या तोंडून परमात्मा महावाक्य ऐकली. त्यांनी सांगितले की,मम्माचे आयुष्य महान होते. त्या ईश्वर सेवेसाठी तत्पर होत्या. १९२० मध्ये पंजाबमधील अमृतसर येथे आई रोचा आणि वडील पोकरदास यांच्या घरी एक आकर्षक व्यक्तिमत्त्व म्हणून मम्माचा जन्म झाला. जो कोणी मम्मासोबत राहिला त्याला वाटले आणि वर्णन केले की, मम्मा एक अतिशय सद्गुणी आत्मा आहे. यज्ञाच्या सुरुवातीला परमात्मा महावाक्य ऐकून लगेच तिने स्वतःला परमात्म्याच्या सेवेत वाहून घेतले. लहान वयातच, मम्मा आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व झाली आणि तिने यज्ञाची जबाबदारी स्वतःच्या हातात घेतली. एकदा ओम मंडळींच्या विरोधात कोर्टात केस सुरू असताना मम्माने येऊन अशी साक्ष दिली की,न्यायाधीशही गप्प झाले. निराकार परमात्म्याने दादा लेखराज यांना कसे माध्यम बनवले? आणि त्यांच्याद्वारे आपल्याला शिकवत आहे हे मम्माने सांगितले. मानवी आत्मा हे सत्य आहे हे देखील स्पष्ट केले आहे.आपण ज्ञान कसे देऊ शकतो? परमात्माच येतो आणि आपल्याला शुद्ध राहण्यासाठी श्रीमत देतो. प्रत्येक मानवाला त्याच्या जीवनाची दिशा आणि हेतू ठरवण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे मम्माच्या स्पष्टीकरणाने ओम मंडळींनी केस जिंकली. मम्मांनी सगळ्यांना विचार करायला भाग पाडलं. "बाबा म्हणाले, मम्माने काही प्रश्न विचारला नाही, मनात शंका आली नाही." मम्मा कुशाग्र बुद्धीची असुन ती शिवबाबांची परमात्मा महावाक्य ऐकायची, ज्ञानमंथन केल्यावर पुन्हा ती ऐकायची. ज्ञानमंथन, ध्यानधारणा,चिंतन , आत्मनिरीक्षण, आंतरिक आनंद, मौन आणि ईश्वराशी सर्व संबंध, ही काही वैशिष्ट्ये यज्ञाला येताच आत्मसात केली होती. मम्माने सर्व समर्पित भावा-बहिणींची मने जिंकली होती. सर्वजण त्यांच्यावर प्रेम करायचे. 'एक बाबा,एक विश्वास' आणि 'कोणाकडून दुःख घेऊ नका,कोणालाही दुःख देऊ नका' हे मम्माचे तत्त्व होते. खरे तर मम्मा या परमात्मा महावाक्य आणि श्रीमताचे प्रतिबिंब होत्या. मम्मा या ब्रह्माबाबांच्या आदर्श शिष्य होत्या. श्रीमत आत्मसात करण्यात त्यांना काही अडचण नव्हती. मम्मा अमृतवेळा योगासाठी पहाटे २ वाजता उठत असत. त्यांनी केवळ स्वतःला आपल्या इंद्रियांचे स्वामी आणि स्व-सार्वभौम बनवले नाही तर त्यांनी इतर आत्म्यांचे उत्थान केले आणि त्यांना मानवाकडून देवता बनण्याची कला शिकवली. मम्माच्या दर्शनातून अनेकांना पाच दुर्गुण(विकार) सोडून मम्मासारखे उन्नत होण्याची प्रेरणा मिळाली. सुरुवातीपासूनच, ज्ञानयज्ञामध्ये मम्माची भूमिका प्रमुख होती आणि १९५० मध्ये ओम मंडली माउंट अबू येथे स्थायिक झाल्यावर ही भूमिका अधिक महत्त्वाची ठरली. त्यानंतर भारतभर या सेवांचा विस्तार होऊ लागला. मम्माने सेवेत अनेक नवीन सेवा केंद्रे स्थापन केली. मम्मा ही यज्ञाची प्रशासिका होती, म्हणून तिने काटकसर आणि उपयोगिता यांचा समतोल राखला (पैसा आवश्यकतेनुसारच वापरला जात असे) व्यक्तिमत्व:-मम्मा अनेक गुणांनी परिपूर्ण होती आणि भक्त देवींची पूजा करत, मम्मा प्रत्यक्षात ९ शक्तींनी परिपूर्ण होत्या. ती इतर आत्म्यांच्या


माता जगदंबा सरस्वती जी

तारणासाठी वापरत. विद्येची देवी माता सरस्वती हिने शिवबाबांची ज्ञानाची परमात्मा वाक्य ऐकली, धारणेचे मूर्त रूप बनले, ज्ञानारूपी वीना वाजवत आणि इतरांनाही अनुभूतीचे मूर्त रूप बनवले. - जगदंबा, समृद्धीची देवी, जी सर्वांना आध्यात्मिक प्रेम आणि अविनाशी आनंद देते.ही शक्तीची देवी आहे, जी शिवबाबांकडून शक्ती घेते, जी स्वतःचे आणि इतरांचे सर्व वाईट गुण आणि दुर्बलता नष्ट करते. काली ही निर्भयतेची देवी आहे, ती निर्भय आणि धैर्यवान आहे आणि जी सर्व नकारात्मक आणि राक्षसी प्रभाव नष्ट करते. शुभ चिन्हांची देवी, गायत्री, आईने नेहमीच शिवबाबांनी दिलेल्या महावाक्यांना महत्त्व दिले आणि त्यांचा महामंत्रांप्रमाणे जीवनात उपयोग केला. या कारणास्तव, गायत्री मंत्राचे देखील विशेष महत्त्व आहे, ज्याचा वापर अशुभ लक्षणे दूर करण्यासाठी जादूने केला जातो. वैष्णवी ही पवित्रतेची देवी आहे जी पवित्रतेची शक्ती पसरवते आणि तिच्या शुद्ध दृष्टी, वृत्ती, विचार आणि कृतीद्वारे इतरांना शुद्ध बनवते. , उमा ही उत्साहाची देवी आहे, जी प्रत्येकामध्ये उत्साह जागवते आणि त्यांच्यामध्ये आशेचे किरण पसरवते. संतोषी ही समाधानाची देवी प्रत्येकामध्ये समाधानाची भावना जागृत करणारी आहे. लक्ष्मी ही संपत्तीची देवी आहे जी सर्वांना ज्ञान, संपत्ती आणि सद्गुण प्रदान करते.

**महान तपस्वी आत्मा**- मम्मा एक अतिशय शक्तिशाली व्यक्तिमत्व होते. त्यांना अशी अवस्था प्राप्त झाली होती की, समोरच्या आत्म्याचे मन त्याच्याकडे फक्त एका नजरेने शुद्ध आणि शांत झाले. एकदा मम्मा पंजाबमध्ये असताना काही लोकांनी सेवा केंद्रावर हल्ला केला आणि मम्माला भेटण्याची चर्चा केली. हे सर्व लोक ब्रह्माकुमारींच्या ज्ञानाला विरोध करण्यासाठी आले होते आणि त्यांना ते केंद्र बंद करायचे होते. नकार देऊनही ते शोधत मम्माच्या खोलीत पोहोचले. मम्मा त्यावेळी तपश्चर्या करत बसल्या होत्या. खोलीत प्रवेश करताच मम्माची दिव्य मूर्ती पाहिल्यावर त्याचा राग शांत झाला आणि ते काहीही न बोलता शांतपणे जमिनीवर बसले. ही माता यज्ञाची (सरस्वती जगदंबा) तपश्चर्या अवस्था होती.

मम्माच्या शब्दात जादूचा प्रभाव होता. च्यांचे शब्द प्रेरणादायी आणि आयुष्य बदलणारे होते. यज्ञाच्या सेवेत त्या प्रजापिता ब्रह्माबाबांचा उजवा हात होत्या. सेवा दरम्यान त्यांची परमात्मा महावाक्ये रेकॉर्ड केली गेली. २८ वर्षांच्या सततच्या ज्ञानमंथनानंतर आणि अथक प्रयत्नांनंतर २४ जून १९६५ मध्ये त्यांनी शरीर सोडले (म्हणजे निधन झाले). आजही ब्राह्मण कुटुंबात त्यांचे जीवन, त्यांचे सद्गुण, वाणी, कृती, प्रेरणेसाठी तसेच विश्व परिवर्तनासाठी महान कार्य स्मरणात आहेत.आज त्यांचा ६० वा स्मृतिदिन "अध्यात्मिक ज्ञान दिवस" म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन व शतशः प्रणाम! ओम् शांती! ईश्वरीय सेवेत!



**- राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी,**
**मुख्य संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नाशिक जिल्हा**

# नांदगावचे ग्रामीण रुग्णालय बनले 'मृत्यू'चे ठिकाण?

## रुग्ण बेहाल तर आरोग्य विभाग गप्प!

**नांदगाव ।** नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालय सध्या रुग्णांसाठी उपचार केंद्र राहता लाचारी आणि दुर्लक्ष याचे स्मारक बनले आहे. औषधांचा आणि सुविधांचा संपूर्ण अभाव असून सध्या या रुग्णालयात डी. टी. इंजेक्शन, बी. पी.व शुगरच्या गोळ्या, खोकल्याचे सिरप, डायक्लोझल इंजेक्शन, आय. व्हि. सेट यासारख्या अत्यावश्यक औषधांचाही तुटवडा आहे.

या ग्रामीण रुग्णालयातील ओपीडी आणि वार्ड पूर्णपणे रिकामे असून ऑपरेशन थिएटर मध्येही एकही उपचार नाही. रुग्ण नाहीत, डॉक्टरांची उपस्थिती नाही. सेवाभाव नाही. नाशिक जिल्ह्याचे शल्य चिकित्सक डॉ. शिंदे यांच्याकडे वारंवार तक्रारी देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आरोग्य मंत्री केव्हा जागे होतील? नांदगावकरांना आरोग्य सेवा मिळणार की नाही? यामुळे नांदगाव शहरात संताप वाढतोय. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून सामाजिक संघटना आणि जनप्रतिनिधी आता एकत्र येत असून जर लवकर उपायोजना न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे."न्यास नसेल, तर संघर्ष अटळ!" असे सध्या आहे. तसेच नांदगाव तालुक्यातील जामदरी येथील




गर्भवती महिलेला नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करून न घेता तिला दिवसभर ग्रामीण रुग्णालयाच्या बाहेर बसून ठेवण्याचा धक्कादायक प्रकार दिनांक 21 जून 2025 रोजी शनिवारी समोर आला. सदर घटना समजल्यानंतर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख फरहान खान यांनी डॉक्टरांना जाब विचारल्यानंतर सदर महिलेची सुखरूप प्रसुती झाली. दरम्यान रुग्णालयाच्या या आक्षेपार्य कृतीबाबत नांदगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

नांदगाव तालुक्यातील जामदरी येथील एका गर्भवती महिलेला दिनांक 21 जून 2025 रोजी शनिवारी सकाळी दहा वाजता तिच्या नातेवाईकांनी प्रसूतीसाठी नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र वेगवेगळे कारणे देत त्या महिलेला प्रसूतीसाठी दाखल करून न घेता सदर महिलेला दिवसभर ग्रामीण रुग्णालयाच्या बाहेर बसवून ठेवण्यात आले. दर महिन्याचे सिजर करावे लागणार असल्याचे सांगत त्यासाठी डॉक्टर उपलब्ध नसल्याचेही कारण देण्यात आले. सदर बाब युवासेनेचे प्राण खान यांना समजल्यानंतर त्यांनी डॉक्टर शांताराम राठोड यांच्यासह सदर महिलेच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. त्यानंतर रात्री दहा ते अकरा वाजेच्या सुमारास सदर महिलेची प्रसूती सुखरूप झाली. त्या महिलेला कन्यारत्न प्राप्त झाले. दरम्यान नांदगाव तालुक्याचे आमदार सुहास कांदे यांनी सदर मुलीच्या संगोपनासाठी २१ हजार रुपये देण्याची जाहीर केले. मात्र नांदगाव ग्रामीण रुग्णालयाचे व्यवस्थापनाच्या निष्क्रिय कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

# गजू घोडके यांचा मनपा प्रवेशद्वारासमोर उपोषणाचा इशारा

**सिडको ।** द्वारका येथील महानगरपालिका मलेरिया विभागाच्या जागेतील टपऱ्या मालकांचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असले तरी, वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न सुटण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचा ठाम इशारा सामाजिक कार्यकर्ते गजू घोडके यांनी दिला आहे.

द्वारका चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी टपऱ्या मागे घेणे हाच योग्य तोडगा असून, यामुळे ना टपरीधारकांचे नुकसान होईल ना वाहतूक अडथळा निर्माण होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'या मागणीची अंमलबजावणी



येत्या १५ दिवसांत झाली नाही, तर मी स्वतः मनपा मुख्य प्रवेशद्वारासमोर उपोषणाला बसणार आहे.'

द्वारका चौक हा सिंहस्थाचा शाही मार्ग असून येथे होणारी सततची वाहतूक कोंडी ही नागरिकांसाठी डोकेदुखी ठरली आहे. शहरात प्रवेश करताना या चौकात सर्व बाजूंनी वाहने अडकतात, त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. प्रशासनाने यापूर्वी काही वेळा उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला असला, तरी परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही, असा आरोप घोडके यांनी केला. खरबंदा पार्क ते पंजाब हॉटेल या परिसरात सुमारे शंभर टपऱ्या गेल्या चाळीस वर्षांपासून आहेत. अनेक टपऱ्या मूळ धारकांकडून दुसऱ्या व्यक्तींना भाडेतत्त्वावर देण्यात आल्या आहेत. ही जागा महानगरपालिकेच्या मलेरिया विभागाच्या मालकीची असून, यासंदर्भातील खटला सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. स्थानिक न्यायालयाने टपरीधारकांच्या बाजूने निकाल दिला आहे, असे घोडके यांनी सांगितले. शासनाने हे प्रकरण लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी करत घोडके यांनी इशारा दिला की, न्यायालयाचा निकाल लांबणीवर पडल्यास आणि प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल. द्वारका परिसरातील वाहतूक समस्या सुटण्यासाठी न्यायप्रविष्ट प्रकरणावर योग्य निर्णय घेऊन समन्वयातून उपाय शोधण्याची वेळ आता आली आहे, असे ते म्हणाले.

# कांदा साठा घोटाळ्यावर उच्च न्यायालयाची तत्काळ कार्यवाही

**पिंपळगाव बसवंत ।** गेल्या दहा वर्षांमध्ये देशभरातील शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर घाला घालणाऱ्या सुमारे पाच हजार कोटी रूपयांच्या कांदा साठा घोटाळ्यावरील याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाने तात्काळ दखल घेत ऐतिहासिक पावले उचलली आहेत. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील शेतकरी विश्वासराव मोरे यांनी दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिकेवर १७ जून २०२५ रोजी न्यायालयात सुनावणी झाली असून पुढील सुनावणी १५ जुलै २०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

केंद्र सरकारकडून किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानातून कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचे आरोप आहेत. एफपीसी, नाफेड, एनसीसीएफ आणि कांदा व्यापाऱ्यांच्या संघटनांनी संगनमताने शेतकऱ्यांचे अधिकार आणि पैशांवर डल्ला मारल्याचा दावा करण्यात आला आहे. या घोटाळ्यामुळे राज्यात व देशात हजारो लघु शेतकरी कर्जबाजारी झाले. अनेकांनी नैराश्याच्या गर्तेत जाऊन आत्महत्या केल्या. त्यामुळे हा घोटाळा फक्त आर्थिक नव्हे, तर संविधानिक हक्कांचा आणि मानवी अधिकारांचा उल्लंघन करणारा आहे, असे विश्वासराव मोरे यांनी आपल्या याचिकेत नमूद केले आहे.



## शेतकऱ्यांचे संरक्षण करणे हे माझे कर्तव्य



"हा फक्त आर्थिक घोटाळा नाही, तर संविधानिक न्यायाचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांचे जीवन, हक्क, आणि सन्मानाने जगण्याचे स्वप्न लुबाडले गेले आहे. देशातील गरीब, आदिवासी व लघु शेतकऱ्यांचे संरक्षण करणे हे माझे कर्तव्य समजून मी ही याचिका दाखल केली आहे, सीबीआय, ईडी, इओडब्ल्यू, एनआयए, एफआययु, लोकायुक्त, मानवी हक्क आयोग, आयकर व इतर संस्थांचा समावेश असलेल्या विशेष तपास पथकाची स्थापना करावी. नाफेड, एनसीसीएफ आणि एफपीसी यांच्या सर्व कांदा साठवण व विक्री व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे. शेती योजनांवर न्यायालयीन देखरेखीखाली निगराणी ठेवणारी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करावी. घोटाळ्यात सहभागी आरोपींच्या बेकायदेशीर संपत्तीवर तात्काळ जप्तीचे आदेश द्यावेत. **- विश्वासराव मोरे**

## असे आहे आरोप

बनावट खरेदी, साठवण आणि विक्रीचे कागदपत्र तयार करणे, कांदा खरेदी न करता अनुदान मिळवणे, सरकारी निधीतून खरेदी केलेला कांदा शत्रूराष्ट्रांमध्ये (पाकिस्तान, बांगलादेश) निर्यात करणे, दुबई मार्गे पाकिस्तान व पश्चिम बंगाल मार्गे बांगलादेशापर्यंत कांदा पोहोचवणे, बनावट वेटब्रिज स्लिप्स व विक्री दाखले तयार करून फसवणूक करणे, या संपूर्ण प्रक्रियेत एफपीसी, कांदा व्यापारी, नाफेड व एनसीसीएफचे अधिकारी, महसूल कर्मचारी आणि चार्टर्ड अकाउंटंट्स सहभागी असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

**➤ महत्त्वाचे**

# माजी मुख्याध्यापिका नीलमताई किर्लोस्कर यांचे निधन



**नाशिक ।** येथील नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती रंगुबाई जुन्नरे इंग्लिश मिडीयम हायस्कूलच्या माजी मुख्याध्यापिका नीलमताई किर्लोस्कर यांचे निधन झाले. एक आदर्श शिक्षिका तसेच मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी नाशिक शहरामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली. त्यांनी आधुनिक ज्ञान व भारतीय संस्कारांची अनोखी सांगड घालून शेकडो विद्यार्थी घडविले. संस्थेच्या प्रशासनात कार्यकारी मंडळ उपाध्यक्ष तसेच शिक्षक मंडळाचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषविले होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संस्थेच्या वतीने शोक सभेचे आयोजन गुरुवारी (ता.२६) दुपारी ३:३० वाजता श्रीमती रंगुबाई जुन्नरे हायस्कूलच्या सभागृहात करण्यात आले आहे. संस्था सभासद, माजी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त कराव्यात असे आवाहन ना. ए.सोसायटीचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, अॅड. जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम व सर्व कार्यकारी मंडळ सदस्य, संस्था पदाधिकारी यांनी केले आहे.

# सह्याद्री मित्र संमेलनानिमित्त विश्रामगड ट्रेकवर असंख्य ट्रेकर्सचा सहभाग





**नाशिक ।** नाशिकमध्ये डोंगर भटकंती करणाऱ्या राज्यातील गिऱ्यारोहकांसाठी ५ व ६ जुलै रोजी कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉल येथे आयोजित करण्यात आले असून, संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. या वर्षी संमेलनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिकरांना गडकिल्ल्यांची आवड निर्माण व्हावी, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजावा यासाठी विश्रामगड ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. या ट्रेकमध्ये नाशिकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला. तब्बल पाचशेहून अधिक ट्रेकर्सनी यामध्ये सहभाग नोंदविला.

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या, इतिहासाने नटलेल्या गड-किल्ल्यांना पुन्हा एकदा आपल्या हृदयाच्या कपाऱ्यात उजळवण्याचे आणि सह्याद्री मित्र संमेलनाची साद सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक प्रेरणादायी पाऊल म्हणून २२ जून २०२५, रविवार रोजी विश्रामगड या पवित्र भूमीवर ट्रेक आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला "विश्रामगड" याच ऐतिहासिक स्थळी संमेलनाच्या ध्वनीची पहिली धडक उमटवण्यात आली. नाशिकहून पहाटे सहा वाजता ६ बसेस आणि १४ चारचाकी, तर संगमनेरहून ४ बसेस भरून निघालेल्या उत्साही ट्रेकप्रेमींचा लोंढा, ढगांच्या सावलीत लपलेल्या पट्टेवाडीच्या दिशेने निघाला. पावसाळ्याच्या आगमनाने निसर्ग आपले झुलते रूप खुलवत असतानाच, रस्त्याच्या खाचखळग्यांनी आणि गडाच्या पायथ्याच्या ओढीनेही एक वेगळाचं रोमांच निर्माण झाला होता. पट्टेवाडीमध्ये पोहोचल्यावर 'शिवछत्रपतींचा' गगनभेदी जयघोष करत ट्रेकर्स विश्रामगडाच्या दिशेने निघाले होते. गडावर पोहोचल्यावर पट्टेदेवी मंदिर, प्राचीन गुहा, कातळ दरवाजे, तटबंदी यांनी सर्वांना वेगळ्याच काळात नेऊन सोडलं. गडमाथ्यावर असलेल्या अंबरखान्याच्या इमारतीत साऱ्यांनी एकत्र येत, महाराष्ट्र गीत, गडाचा समृद्ध इतिहास, आणि छत्रपतींच्या शौर्यकथांमधून एक अद्वितीय अनुभव घेतला. शिवरायांचा पुतळा हे श्रद्धेचं व तेजाचं प्रतीक ठरलं होतं. शिवकाळातल्या आठवणींनी सारेच भारावून गेले होते. या ट्रेकमध्ये संमेलनाचे स्वागताध्यक्ष अॅड. नितीन ठाकरे, संजय अमृतकर,आर्किटेक्ट संजय पाटील, माजी विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विभागीय उप-आयुक्त विठ्ठल सोनवणे, पुनीत संकलेचा,विक्रांत बागड, नायब तहसीलदार जितेंद्र धनराळेआदी सहभागी झाले होते. नाशिक गिरीदुर्ग, जल्लोष, जिप्सी, ट्रेंडी, नाशिक क्लाइम्बअर्स अँड रेस्क्युअर्स असोसिएशन या गिर्यारोहण संस्था व श्रीकांत कासट संगमनेर यांची ट्रेकिंग संस्था,आणि इतर अनेक मान्यवर व ट्रेकर्स या मोहिमेत सहभागी झाले होते.

# एसकेडी, व्हीकेडी विद्यालयात योग दिवस उत्साहात साजरा

**देवळा ।** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एस.के.डी.चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक संचलित, एस.के.डी. इंटरनॅशनल स्कूल व व्ही.के.डी. इंग्लिश मिडीयम अँड ज्युनिअर कॉलेज भावडे, येथे विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करून योगाभ्यास केला. शाळेच्या क्रीडांगणात विद्यालयातील नर्सरी ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी आनंदात योगासने केली.या योगाभ्यासात विद्यालयाचे योगशिक्षक निलेश गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना वक्रासन, वज्रासन, पद्मासन, ताडासन, चक्रासन, भद्रासन, भुजंगासन इत्यादी अनेक आसनांचे दैनंदिन जीवनातील फायदे यांचे मार्गदर्शन केले. योग शिबिरात




विद्यालयाच्या शिक्षकांनी सुद्धा विद्यार्थ्यांसोबत योगअभ्यास केला. एस.के.डी विद्यालयाचे पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख शोभा जाधव, तसेच प्रसंगी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक मुद्दसर जमील सय्यद, यज्ञेश आहेर, ययाती जाधव, निलेश भालेराव, राजू देवरे, किरण चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्थेचे अध्यक्ष संजय देवरे व सेक्रेटरी मीना देवरे यांनी योग दिनाला शुभेच्छा दिल्या.

## महत्त्वाचे

## विजेचा शॉक लागून वायरमनचा जागीच मृत्यू

### सटाणा येथील दुर्दैवी घटना



**सटाणा ।** भल्या सकाळी घरातील पाण्याची मोटर लावण्यासाठी गेले असता पिन जोडताना विजेचा शॉक लागल्याने सटाणा येथील वायरमन हेमंत (पप्पू) विठ्ठल खैरनार यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे या घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत आहे. नामपूर शहरात विद्युत महामंडळात कार्यरत असलेले हेमंत विठ्ठल खैरनार हे सटाणा येथिल रिंग रोड मधील संस्कृती नगर मध्ये आपल्या परिवार सह राहत होते. आज सकाळी घरात पिण्याचे पाणी आले असता ते पाण्याची मोटर लावण्यासाठी गेले होते दुर्दैवाने विजजोडत असतांना विजेचा जबरदस्त शॉक लागल्याने हेमंत खैरणार याचा जागीच मृत्यू झाला. दहा मिनिटे झाली तरी मोटार मधून पाणी का येत नाही हे बघण्यासाठी त्याची पत्नी घटनास्थळी गेली असता तीला सदरचा प्रकार दिसुन आला. मयत हेमंत खैरनार यास तातडीने शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले असता त्यास तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. सदरची घटना शहरात समजताच चांगलीच हळहळ व्यक्त होत आहे. विद्युत महामंडळाच्या कर्मचारी यांनी सटाणा येथिल शासकीय ग्रामिण रुग्णालयात धाव घेतली आहे. हेमंत खैरनार हे चौगाव येथिल रहिवासी असुन त्यांचा पश्चात आई, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. दरम्यान काल दुपारी ४ वाजता शोकाकुल वातावरणात मयत तरुणावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## योग साधनेतून आरोग्यदायी जीवनाची वाटचाल : छाया नागरे

**निफाड ।** जगभरातील स्पर्धा, भोगवाद व तणावाच्या युगात मानसिक व शारीरिक आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे. यासाठी प्रत्येकाने दररोज योगासने व प्राणायामाचा सराव करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन योग शिक्षिका



छाया नागरे यांनी जागतिक योग दिनानिमित्त केले. योग दिनाचे औचित्य साधून छाया नागरे आणि त्यांच्या सहकारी योग शिक्षिकांनी निफाडमधील एम फिटनेस क्लब, आशीर्वाद योगा क्लासेस, प्रथमेश एज्युकेशन फाउंडेशन, प्रज्ञा सूर्य फाउंडेशन, नयन एज्युकेशन फाउंडेशन, तसेच निफाड पोस्ट ऑफिस येथे जाऊन योगाविषयी माहिती देत प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात योग प्रार्थनेने झाली. त्यानंतर शिथिलीकरण, स्कंध संचालन आणि विविध प्रकारच्या योगासने उभे, बसून करायची तसेच पोट व पाठीच्या आधारावर होणारी आसने यांचे सखोल प्रात्यक्षिक करण्यात आले. वृक्षासन, त्रिकोणासन, पश्चिमोत्तानासन, उष्ट्रासन, नौकासन, धनुरासन, भुजंगासन, पर्वतासन, शशांकासन, पवनमुक्तासन, शलभासन इत्यादी योगासने उपस्थितांनी प्रत्यक्ष करून पाहिली.

## खर्डे येथील इंदिरा गांधी विद्यालयात योग दिन

**देवळा ।** विधायक कार्य समिती संचलित खर्डे येथील इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिन



साजरा करण्यात आला. शिक्षक आबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील उपस्थित सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी सामूहिकरित्या विविध योगासने घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पालक संघाचे उपाध्यक्ष शशिकांत ठाकरे, सचिन गांगुर्डे, प्रकाश कुवर आदींसह प्राचार्य संजय आहेर, डी. पी. परचुरे, एच. एम. सूर्यवंशी, आर. एन. आहिरे, पी. के. दळवी, आबा आढाव, एस. डी. बागुल, संजय सोनवणे, रुपाली पवार, एस. के. बागुल, एम. बी. जाधव, वैशाली पाटील, साहेबराव महाले, किशोर क्षेत्रीय, चंदन आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

## सुनीता सोनवणे यांचे निधन



**नाशिक ।** मुंबई मंत्रालयातील सेवानिवृत्त कर्मचारी, वडगाव ता. कोपरगाव येथील रहिवासी भागिनाथ सोनवणे यांच्या पत्नी सुनीता भागिनाथ सोनवणे (वय ५८) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दीर, दोन नणंद, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. चेंबूर, मुंबई येथील कुंदन सोनवणे यांच्या त्या मातोश्री होत. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांच्या त्या मावशी होत.

# यंदाच्या पावसाळ्यात अधिक सुरक्षित, सफाईदार, विना अडथळा प्रवासाची सोय : हेमंतकुमार

### इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडची पत्रकार परिषद







**इगतपुरी ।** दमदार पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह आम्ही यंदाच्या पावसाळ्यात अधिक सुरक्षित, सफाईदार आणि विनाअडथळा प्रवासाची सोय करण्यासाठी बांधील आहेत. आमच्या 24×7 टोल आणि हायवे ट्रॅफिक कंट्रोल रूममुळे प्रत्यक्ष वेळेत देखरेख करता येते, तर संपूर्ण मार्गावर असलेल्या १०३३ हेल्पलाइन बोर्ड्समुळे स्थानिक प्रशासनासह समन्वय साधून लगेच प्रतिसाद देणे शक्य होते, असे मत इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडचे प्रकल्प प्रमुख हेमंत कुमार यांनी व्यक्त केले.

इगतपुरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आयएचपीएलतर्फे पावसाळ्यातील संभाव्य संकटकालीन परिस्थितीसाठी वेगवान इमरजन्सी रिस्पॉन्स टीम तैनात असून वडापे- गोंडे मार्गावर अधिक जलद आणि सुरक्षित प्रवासाची खात्री देत असल्याचेही त्यांनी सांगीतले. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले की, महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडने (आयएचपीएल) वडापे- गोंदे या इगतपुरी आणि नाशिकमधून जाणाऱ्या ९६.६४ किमी हायवेवर प्रवाशांची सुरक्षा कायम राखण्यासाठी आवश्यक तयारीत वाढ केली आहे.

पावसाळ्याशी संबंधित परिस्थितीला तोंड देण्यासाठी आयएचपीएलने वडापे- गोंडे कॉरिडॉरदरम्यान पावसाळापूर्व दुरुस्ती व देखभालीची कामे पूर्ण केली आहेत. त्यात रस्त्याच्या पृष्ठभागाची दुरुस्ती, ड्रेनेज, स्वच्छता आणि पॉटहोल्ससाठी प्रतिबंधात्मक सोयी यांचा समावेश आहे. पर्यायाने हा मार्ग सुरक्षित आणि स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. इमरजन्सी रिस्पॉन्स टीम्स पाणी साचणे, दगडे दूर करणे अशा कामे तातडीने करण्यासाठी हायवेवरच्या प्रमुख ठिकाणी खास तैनात करण्यात आल्या आहेत. डि- वॉटरिंग पंप तत्काळ वापरासाठी प्रोजेक्ट कॅम्पवर ठेवण्यात आला असून त्याचबरोबर मोक्याच्या ठिकाणी जेसीबी, टिपर्ससारख्या अवजड यंत्रणा मदतीसाठी सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. ऐन पावसात वाहनांचा प्रवास योग्य वेगाने होण्यासाठी प्रशिक्षित ट्रॅफिक मार्शल्स वाहनकोंडी होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. रात्रीच्या वेळेस दृश्यमानता वाढावी यासाठी कमी प्रकाश असलेल्या भागात १८ एल टाइप ब्लिंकर्स बसवण्यात आले आहेत.

संपूर्ण मार्गावरील प्रकाशयोजनेत सुधारणा करण्यात आली असून हवामान- प्रतिबंधक, हाय-लक्झ फिक्सर्च व नवीन हाय-मास्ट लाइट्स एनएचएआयद्वारे खडवली जंक्शनसारख्या महत्त्वाच्या टप्प्यावर बसवण्यात आले आहेत. विविध वृत्तवाहिन्या व वर्तमानपत्राचे प्रतिनिधी यावेळी हजर होते कार्यक्रमाचे नियोजन अनिल जाधव, पत्रकार राजेश जाधव यांनी केले.

### मोक्याच्या ठिकाणी रॅपिड रिस्पॉन्स टीम तैनात

इगतपुरी आणि नाशिकमधून जाणाऱ्या या महत्त्वाच्या टप्प्यावर एनएचएआयच्या नियमांनुसार संकटकालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणारी आवश्यक यंत्रणा तसेच सुरक्षेच्या सोयीसुविधा तैनात करण्यात आल्या आहेत. अडथळे कमी करण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी आयएचपीएलने पावसाशी संबंधित घटनांवर वेगाने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी रॅपिड रिस्पॉन्स टीम तैनात केल्या आहेत. पाणी साचणे, कमी दृश्यमानता आणि निसरड्या रस्त्यांमुळे खूपदा पावसाळ्यात रस्त्याची सुरक्षा कमी होते. आयएचपीएलने सक्रियपणे दमदार यंत्रणा आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत हा प्रवास सुरक्षित, सफाईदार आणि अडथळे मुक्त व्हावा याची खात्री केली आहे. 'आयएचपीएलमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते, आम्ही आमची यंत्रणा आणखी मजबूत करत पावसाळ्या दरम्यान जास्त वेगाने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देता यावा यासाठी आवश्यक नियम जारी केले आहेत. आमच्या टीम या मार्गावर कार्यरत असून कोणत्याही परिस्थितीत अडकलेल्या प्रवाशांना सहकार्य करण्यासाठी सक्षम आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

### तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा

अपघातांचा धोका आणखी कमी करण्यासाठी अतिरिक्त चिन्हे, धोक्याचा इशारा देणारे ब्लिंकर्स सध्याच्या स्ट्रक्चरल वर्क झोन्सवर विशेषतः वडापे आणि कसारादरम्यान कमी व्याप्ती असलेल्या भागात बसवण्यात आले आहेत. रियल- टाइम अलर्ट्समुळे ड्रायव्हर्सना ग्रस्त भागातूनही सुरक्षितपणे मार्ग काढता येतो. आयएचपीएलने दोन्ही टोल प्लाझावरील पायाभूत सुविधा अद्ययावत करत फास्टॅग प्रक्रियेचा वेग वाढवला असल्यामुळे रांगेत थांबण्याचा वेळ कमी झाला आहे. पर्यायाने गर्दीच्या वेळी ट्रॅफिक होण्याचा धोकाही कमी झाला आहे. कसारा आणि इगतपुरी ट्रॅफिक कंट्रोल पोलिस व ठाणे जिल्हा प्रशासनाच्या मदतीने आयएचपीएलने पावसाळ्यासाठी खास इमरजन्सी डायव्हर्जन योजना अमलात आणली आहे. बांधकाम भाग किंवा ड्रेनेजची शक्यता असलेल्या ठिकाणी हवामान प्रतिबंधित लायटिंग व बॅक अप सिस्टीम्स तयार करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे वीज नसतानाही चांगली दृश्यमानता मिळते. आयएचपीएलच्या 24×7 टोल आणि हायवे ट्रॅफिक कंट्रोल रूममुळे रियल टाइममध्ये हायवेवरील स्थितीवर देखरेख करता येते. १०३३ क्रमांकाचे इमरजन्सी हेल्पलाइन बोर्ड्स संपूर्ण मार्गावर बसवण्यात आले आहेत. कॉल आल्यानंतर प्रशिक्षित आयएचपीएल रिस्पॉन्स टीम्स तातडीने पाठवण्यात येतात आणि त्यात स्थानिक प्रशासनाच्या मदतीने वेगवान व प्रभावीपणे मदत करतात.

# खेळाडूंनी मेहनत घेऊन देशाचे नाव जगात उंचवावे : पद्मश्री जफर इक्बाल

### जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त क्रीडा रॅली, कार्यक्रम संपन्न



**नाशिक ।** २३ जून हा दिवस जागतिक ऑलिम्पिक दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. हा दिवस उत्साहात साजरा करण्याच्या हेतूने गेल्या १६ वर्षापासून नाशिक डिस्ट्रिक्ट मल्टी गेम्स असोसिएशन, कालिका मंदिर, यशवंत व्यायाम शाळां आणि विविध क्रीडा असोसिएशन यांच्या वतीने अनेक क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते. या वर्षीही सकाळी ८. ३० वाजता क्रीडा रॅलीचे आयोजन करण्यात आले.




काळाराम मंदिर येथे प्रमुख पाहुणे ऑलिम्पिक सुवर्णपदक प्राप्त जफर इक्बाल यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून या क्रीडा रॅलीला सुरवात करण्यात आली. यावेळी नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देशमुख, हेमंत पांडे, विग कमांडर प्रदीप बागमार, दीपक पाटील, अशोक दुधारे, आनंद खरे, नितीन हिंगमिरे, राजू शिंदे, शशांक वझे, अविनाश खैरनार, प्रशांत गायकवाड तसेच सर्व क्रीडा शिक्षक आणि सर्व खेळांचे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाला नाशिकच्या जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुनंदा पाटील आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी भेट देऊन खेळडूंचा उत्साह द्विगुणित केला. श्रीमती सुनंदा पाटील यांनीही खेळडूंना मार्गदर्शन केले. काळाराम मंदिरपासून क्रीडा रॅली पंचवटी कारंजा, रविवार कारंजा, यशवंत व्यायाम शाळा येथे आणण्यात आली. तेथे यशवंत व्यायाम शाळेच्या वतीने अध्यक्ष दीपक पाटील यांनी या क्रीडा रॅलीचे आणि प्रमुख पाहुणे, क्रीडा संघटक आणि खेळाडूंचे स्वागत केले. यशवंत व्यायाम शाळा येथे ऑलिम्पियन जफर इक्बाल यांना येथील सर्व खेळांच्या सुविधा दाखवण्यात आल्या.

त्यानंतर क्रीडा रॅली मेहेर चौक, सी. बी. एस. चौक, गडकरी चौक मार्गे कालिका देवी मंदिर येथे नेण्यात आली. येथे कालिका देवी मंदिर संस्थांनचे अध्यक्ष केशव पाटील यांच्या हस्ते रॅलीचे स्वागत करण्यात आले. येथे प्रमुख पाहुणे जफर इक्बाल यांनी खेळाडूंना संबोधित केले. त्यांनी आपले खेळातील अनुभव सांगितले आणि लहान वयातच खेळाडूंनी मेहनत घेतल्यास आंतरराष्ट्रीय स्तर आणि ऑलिम्पिक पर्यंत मजल मारता येते. यासाठी खेळाडूंनी जोमाने प्रयत्न करून आपल्या देशाचे नांव जगात उंचवावे असे सांगितले. या रॅलीमध्ये विविध खेळांच्या २१० खेळाडूनी आपला सहभाग नोंदवला. हा जागतिक ऑलिम्पिक दिवस साजरा केला. यानंतर आज २३जून ते ३० जून या ऑलिम्पिक क्रीडा सप्ताहां अंतर्गत बास्केटबॉल, तलवारबाजी, व्हॉलीबॉल, मिनी फुटबॉल, कॅरम, टेनिस व्हॉलीबॉल, गोल्फ, टेबल टेनिस, सेपक टकरा अश्या विवीध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बास्केटबॉल, तलवारबाजी, व्हॉलीबॉल, मिनी फुटबॉल, कॅरम, टेनिस व्हॉलीबॉल तसेच वरिष्ठ गटाच्या गोल्फ स्पर्धा आणि ३९ वर्षावरील टेबल टेनिस स्पर्धा या विविध स्पर्धांचा समावेश आहे.

या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे आणि हा ऑलीम्पिक सप्ताह यशस्वी करावा असे आवाहन नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशन, यशवंत व्यायाम शाळा, कालिका देवी मंदिर आणि विविध खेळांचे पदाधिकारी, प्रशिक्षक यांनी केले आहे.

## द्वारका चौक वाहतूक कोंडीबाबत गडकरी, फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक



**नाशिक ।** येथे सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मध्ये होणार आहे. सिंहस्थाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग संदर्भात करावयाच्या सुधारणांच्या बाबत मुख्यमंत्री सचिवालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री व सिंहस्थ मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार देवयानी फरांदे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार फरांदे यांनी आगामी सिंहस्थापूर्वी द्वारका येथील उड्डाणपुलाचे काम करणे गरजेचे आहे असे नमूद केले. गडकरी यांनी यावेळी उपस्थित असणारे एमएसआरडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीक्षित व मुख्य अभियंता हांडे यांना द्वारका सर्कलचा अभ्यास करू करंबोळीच्या धरतीवर काम करण्याचे आदेश दिले. तसेच छ. संभाजीनगरकडे जाण्यासाठी द्वारका सर्कलच्या अलीकडे एक्झिट दिले आहे. त्यानंतर कुठेही एक्झिट दिलेले नाही. त्यामुळे छ. संभाजीनगरकडे जाणारी सर्व वाहतूक ही द्वारका सर्कल मार्गे जाते. त्यामुळे छ. संभाजीनगरकडे जाण्यासाठी व छ. संभाजीनगरकडून येणाऱ्या वाहनांसाठी द्वारका सर्कलपर्यंत उड्डाणपुलावर चढण्यासाठी व उतरण्यासाठी नवीन मार्ग करण्याची मागणी फरांदे यांनी केली. तसेच द्वारका येथील अंडरपास पदचारी मार्ग हे कोणत्याही प्रकारच्या उपयोगाचे नसल्याने ते बंद करण्याची मागणी त्यांनी केली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी ढगे यांना याबाबत पाहणी करून अहवाल देण्याचे आदेश गडकरी यांनी दिले. यावेळी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, नाशिक मनपाचे शहर अभियंता अग्रवाल आदींसह मोठ्या प्रमाणावर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कत्तलीसाठी नेत असलेला जनावरांनी भरलेला ट्रक पकडला

### नऊ गायी व सहा वासरांची सुटका; दोन आरोपी अटकेत

**नाशिक ।** नाशिक गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने कत्तलीसाठी अवैधरित्या नेले जात असलेला गोवंश भरलेला ट्रक पकडत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ९ गायी, ६ वासरे आणि १ मृत वासरू यांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. एकूण १२ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी दिलेल्या सूचनांनुसार नाशिक शहरात अवैध गोवंश वाहतूक व कत्तलीविरोधात मोहीम राबवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, २२ जून २०२५ रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस





अधिकारी आणि अंमलदार नाशिकरोड परिसरात तपास करत असताना पोहवा मनोहर शिंदे यांना गुप्त बातमी मिळाली की, नाशिक–पुणे महामार्गावरून एक ट्रक कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणार आहे. त्यानुसार, सपोनि हेमंत तोडकर (प्रभारी अधिकारी, युनिट २) यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने चेहडीगाव, दारणेश्वर मंदिराजवळ सापळा लावून GJ 24 V 8563 क्रमांकाचा टाटा कंपनीचा ट्रक ताब्यात घेतला. या ट्रकमधून९ गायी६ वासरे१ मृत वासरू हे सर्व जनावरे वाहन क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात व अमानुषरित्या दाटीवाटीने भरलेले होते.

यामध्ये बिलाल उस्मान मरेडिया (वय ३१), रा. काकोशी, ता. सिधपूर, जि. पाटण, गुजरात– ट्रक मालक, महिंद्रसिंग जगतसिंग जाधव (वय २६), रा. नानावास, ता. डिसा, जि. बनासकांठा, गुजरात– ट्रक चालक पोलीस अंमलदार संजय पोतींदे यांनी या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ), ५(ब), ९, प्राण्यांना कुरतेने वागविणे प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(क), (घ), (ङ), (ज), ११(४)(ठ) तसेच केंद्रीय मोटार वाहन कायदा कलम १२५ नुसार गुन्हा दाखल केला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# चार हजार सायकल वारकऱ्यांचा पंढरीत रंगला रिंगण सोहळा



**नाशिक ।** येथील सायकलिस्ट फाउंडेशनच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी सायकलवारीचे आयोजन करण्यात येते. यंदाची यावर्षीची १३ वी वारी, नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे ३०० सदस्य या वारीत सहभागी झाले. दिनांक २० जून रोजी अहिल्यानगर येथे पहिला मुक्काम करून, २१ जून रोजी सायंकाळी पंढरपूर येथे सायकल वारकरी सुखरूप पोहोचले. २२ जून रोजी अखंड महाराष्ट्रातील ९१ क्लबचे ४ हजार सायकलिस्ट पंढरपूर येथे जमले. सकाळी प्रभात फेरी काढून विठ्ठल मंदिराला सायकलवर नगरप्रदक्षिणा घालून सर्व सायकलिस्टचा ताफा रेल्वे ग्राउंड वर रिंगण सोहळ्यासाठी सज्ज झाला. गेल्या तीन वर्षांपूर्वी नाशिक सायकलीस्ट फाउंडेशनने अखंड महाराष्ट्रातील सायकलिस्टला पंढरपूर येथे एकाच दिवशी एकत्रित येण्यासाठी पुढाकार घेतला. आज चार हजार सायकल वारकऱ्यांचा नेत्रदीपक रिंगण सोहळा बघून डोळ्याचे पारणे फिटले. लातूर सायकलिस्ट क्लबने स्वयंस्फूर्तीने यावर्षीचे यजमानपत्र स्वीकारले. या रिंगण सोहळ्यासाठी अतिशय सुंदर असे नियोजन होते. ग्राउंडवर रिंगण साठी पांढऱ्या रांगोळीने वर्तुळे आखली होती. आयोजकांच्या सूचनेनुसार शिस्तबद्ध पद्धतीने सायकलिस्ट आपली सायकल उभी करून विठू नामाचा गजर करत मोठ्या जल्लोषात रिंगणात सामील झाले. रिंगणात सायकल वारकऱ्यांची मांदियाळी सज्ज झाल्यावर केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली फिट इंडिया मुव्हमेंट साठी सायकलिस्टचे मोठे योगदान आहे. या रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने आपणा सर्वांची भेट झाली, स्वतःला खरोखर नशीबवान समजते असे मत रक्षाताई यांनी व्यक्त केले. त्यांनी स्वतः रिंगणातून सर्वांची भेट घेतली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन ग्रुप बरोबर दृष्टीहीन सायकलिस्ट सायकल चालवत टॅण्डम सायकलवर पंढरपूरला आले, याचे त्यांनी विशेष कौतुक केले. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व खासदार धर्यशील मोहिते पाटील हे देखील अतिथी म्हणून उपस्थित होते. लांब पल्ल्याचा सायकल प्रवास करून आलेले सायकलप्रेमी विठ्ठलाचे भजन कानावर पडताच नृत्यात तल्लीन झाले. विठ्ठलाच्या भक्तीत सायकल वारकऱ्यांनी मनमुराद आनंद घेतला. कुणी आपल्या क्लबचा झेंडा उंचावून, तर कोणी सायकल उचलून तर कोणी फुगड्या घालून आनंद व्यक्त केला.

सायकल रिंगण सोहळ्यानंतर विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास समोरील प्रांगणात भव्य सभा मंडपात 'चतुर्थ अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी संमेलन २०२५' पार पडले. या कार्यक्रमात सायकलिस्टला मार्गदर्शन करण्यासाठी भारतातील पहिले सोलो रॅम फिनिशर डॉ.अमित समर्थ हे नागपूर वरून ३२ तासात ६७५ की.मी. सायकल प्रवास करून सायकल संमेलनात पोहोचले. संमेलनाच्या उद्घाटनासाठी सहकार राज्यमंत्री बाबासाहेब पाटील हे उपस्थित होते.





## सायबर क्राईम या विषयावर पथनाट्य सादर केले

उपस्थित सर्व सायकलिस्टने पर्यावरण संवर्धनाविषयी शपथ घेतली. पंढरपूरचे परिचारक उमेश मालक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अखिल महाराष्ट्र संमेलनाचे उपाध्यक्ष राजेंद्र वानखेडे यांनी सायकल चळवळ व्यापक होण्यासाठी उपस्थित सायकलिस्टला मार्गदर्शन केले. प्रत्येक क्लबच्या अध्यक्ष व सायकलिस्ट क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याबद्दल एका सायकलिस्टचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर काळे यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच डॉ. मनिषा रौंदळ यांनी महिला असून आत्तापर्यंत सलग 11 वेळा पंढरपूर सायकलवारी केल्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले. एका पायाने सायकल चालविणारा दिव्यांग सायकलिस्ट सुनील पवार याचा विशेष सन्मान करण्यात आला. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या टीमने सायबर क्राईम या विषयावर प्रबोधनात्मक अतिशय छान पथनाट्य सादर केल्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले. पंढरपूर सायकल वारी प्रॅक्टिस राईड चॅलेंजचे मेडल वितरण पंढरपूर संमेलनात करण्यात आले. यासाठी चंद्रकांत नाईक आणि रवींद्र दुसाने यांनी प्रचंड मेहनत घेतली. नाशिक ते पंढरपूर सायकल वारीत भा.ज.पा.चे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी हे पण सहभागी झाले होते. एन.सी.एफ.चे अध्यक्ष किशोर काळे, उपाध्यक्ष अरुण पवार, डॉ. मनिषा रौंदळ, सचिव संजय पवार, संचालक दीपक भोसले, पंकज कुमार पाटील, सुरेश डोंगरे व नितीन कोटकर यांच्या मार्गदर्शनाखाली छान पार पडली. वारी प्रमुख आय.पी. एस. संजय बारकुंड, माधुरी गडाख, प्रवीण कोकाटे, बजरंग कहाटे यांनी विशेष मेहनत केली.



## ➢ महत्त्वाचे

### कारण नसताना २५ वर्षीय तरुणाला केली बेदम मारहाण

**मनमाड ।** नांदगाव रोडवर असलेल्या सिकंदर नगर येथे मुलांशी गप्पा मारणाऱ्या २५ वर्षीय तरुणाला कारण नसताना आठ ते दहा लोकांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी मनमाड पोलिस स्थानकात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मनमाड पोलीस स्थानकात सध्या मनमाड शहरात वास्तव्य करणाऱ्या नबा प्रेम दास, वय २५, रा. रामपूर जिल्हा लखीमपूर, राज्य - आसाम याने फिर्याद दिली आहे.शहरातील सिकंदर नगर भागात असलेल्या मेडिकल जवळ उभा असताना तेथील राहणाऱ्या मुलींशी बोलत असताना कोणतेही कारण नसताना देखील इरफान सय्यद व आठ ते दहा लोकांनी हाताच्या चापटीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच वाईट साईट शिवीगाळ करून जिवे मारण्याचा दम देखील दिला. गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विजयकरे करीत आहेत.

### मौसम प्यार का... मैफलीत श्रोते चिंब

**नाशिक ।** रविवारची सायंकाळ, रिमझिम पाऊस, सुरेल गाण्यांची बरसात यांनी रसिक श्रोते चिंब होऊन गेले. सुरांच्या धुंदीने मैफलीची रंगत उत्तरोत्तर अधिकाधिक खुलत गेली. हर्ष - राज या नव्याकोऱ्या सभागृहात कलाकारांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एच आर स्टुडिओ




**नव्या कोऱ्या सभागृहात उत्स्फूर्त प्रतिसाद**

प्रॉडक्शन आयोजित मौसम प्यार का... ही सुरेल मैफल काल रविवारी (दि.२२) हर्ष-राज सभागृहात रंगली. सायंकाळी ६ वाजता झालेल्या या मैफलीत हर्षद शिंत्रे, मृणाली मालपाठक, राजेश दाणी, नमिता राजहंस, ज्ञानेश वर्मा, अश्विनी सरदेशमुख, प्रशांत चंद्रात्रे, वैष्णवी पगारे यांनी सुरेल गाणी सादर केली. क्या नजारे...,ए री पवन...,आ जाने जा...,एक लडकी भिगी भागी सी...,यारा सिली सिली...,तुम्हे बढकर दुनिया में..., आज रपट जाये तो... अशा एक से बढकर एक २५ गाण्यांना रसिकांची उत्स्फूर्तपणे मिळाली. लेकर हम दिवाना दिल... या युगुल गीताने मैफलीची सांगता झाली. निवेदक समीर ओतुरकर यांनी प्रत्येक गाण्यामागची पार्श्वभूमी, चित्रपटांमधील किस्से आणि विविध आठवणी सांगून मैफल अधिकच रंगवली.

# बिघाडामुळे पुणे-मालेगाव एसटी बसला अपघात

## सुदैवाने जीवितहानी टळली...

**मनमाड ।** मनमाड शहराच्या कॅम्प भागात इंदूर-पुणे महामार्गावर आज पुणेहून मालेगावकडे जाणाऱ्या एसटी बसला तांत्रिक बिघाडामुळे अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, बसचे नुकसान झाले आहे.

अपघातग्रस्त बस (क्रमांक एम.एच.२० सीजी-२७७१) पुणेहून मालेगावकडे जात असताना मनमाडच्या कॅम्प परिसरात तिचे ब्रेक लायनर अचानकच चिपकले. त्यामुळे बसचे चाक अचानक लॉक झाले आणि नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या कडेला असलेल्या नालीत अडकली. बसमध्ये एकूण १६ प्रवासी होते. सर्व प्रवासी सुखरूप असून त्यांना तात्काळ मदत पुरवण्यात आली.



अपघातानंतर बस चालक आणि वाहक यांनी प्रसंगावधान राखून सर्व प्रवाशांना मागून येणाऱ्या दुसऱ्या बसमध्ये सुरक्षितपणे बसवून त्यांचा पुढील प्रवास सुरू केला. घटनेची माहिती मिळताच मनमाड आगारातील अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि बस दुरुस्त करण्याचे काम तत्काळ सुरू केले. क्रेन द्वारे बस काढण्याचे काम सुरू होते. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी न झाल्याने मोठा अनर्थ टळला आहे. तरीही प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एसटी प्रशासनाने अशा तांत्रिक बिघाडांवर वेळोवेळी लक्ष देण्याची गरज आहे.

# गोखले फार्मसी महाविद्यालयातील समीक्षा गिरी हिची बिट्स पिलानी येथे निवड

## भारतातून दहा सीट्सपैकी झाली प्रथम निवड

**नाशिक ।** नामांकित संस्थेतून पदव्युत्तर शिक्षण घेणे, हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते. नामांकित संस्थांमध्ये शिक्षण घेतल्याने चांगल्या करिअरच्या संधी मिळतात आणि भविष्यात चांगली नोकरी मिळवण्याची शक्यता अधिक वाढते. नाशिकमधील शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणूनगोखले एजुकेशन सोसायटी गेल्या १०७ वर्षांपासून नावारूपास आलेली आहे. याच संस्थेच्या सर डॉ. मो.स.गोसावी फार्मसी महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकत असलेल्या समीक्षा देवीदास गिरी हिची पदव्युत्तर शिक्षणाकरिता बिट्स पिलानी राजस्थान कॅम्पस येथे यशस्वीरित्या निवड झाली आहे.



बिट्स पिलानी ही भारतातील सर्वात प्रतिष्ठित आणि मागणी असलेली संस्था आहे. तंत्रज्ञान आणि विज्ञान विषयांच्या इच्छुकांसाठी शिक्षण संस्था सर्वात महत्वाची असून त्यांची अनुक्रमे गोवा, हैदराबाद, राजस्थान व दुबई ही चार स्थापित निवासी कॅम्पस आहेत. जगभरातून बिट्स पिलानी (फार्मसी) हे एनआयआरएफ रँकिंग नुसार सर्वाधिक तिसऱ्या क्रमांकावर येते. सदर परीक्षा ही बहुपर्यायी असून १ जून रोजी घेण्यात आली. त्यात प्रामुख्याने मूळ अंकगणित, इंग्रजी व फार्मसी विषयांचा संपूर्ण अभ्यास असा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आलेला होता. त्यानंतर लगेचच दि.१४ जून रोजी पहिल्या फेरीतच तिला दहापैकी प्रथम सीट देण्यात आले. सदर संस्थेत एम.फार्म केल्यावर बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये संशोधन व सुधारणा विभाग, फोर्मुलेशन डेव्हलपमेंट किंवा गुणवत्ता हमी विभागात चांगल्या पॅकेजवर नोकरी करण्याची इच्छा समीक्षा हिने व्यक्त केली आहे. तिला सदर निवड प्रक्रियेमध्ये प्रा. संदीप पुरकर व प्राचार्य डॉ. सुनील अमृतकार यांचे सखोल मार्गदर्शन लाभले. स्मिता शेळके तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी समीक्षा हिचे अभिनंदन केले.

# टाकेद न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विना नोटीस पालक मेळावा

## गोपनीय पालक मेळाव्याला स्थानिक राजकीय गावगुंडांचा आशीर्वाद

**सर्वतीर्थ टाकेद ।** इगतपुरी तालुक्यातील चर्चेत असणाऱ्या टाकेद येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये बुधवारी (ता.१८) पालक मेळावा घेण्यात आला. या पालक मेळाव्याला शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार ९० टक्के विद्यार्थ्यांचे पालक अनुपस्थित होते.

तरी देखील हा पालक मेळावा गावातील राजकीय लोकांच्या दबावशाहीला बळी पडत नियमबाह्य पध्दतीने घेण्यात आला. या पालक मेळाव्या संदर्भात एक दिवस अगोदर शाळेचे प्राचार्य पाटील यांच्या सुचने नुसार शाळेतील विद्यार्थ्यांना फक्त तोंडी सूचना देण्यात आली होती. मात्र शाळेकडून एकही विद्यार्थ्याला पालक मेळाव्याची रीतसर नोटीस देण्यात आली नसल्याने पालक वर्गांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. दरम्यान अनुदानित शाळा असतांना विद्यार्थ्यांकडून अवाजवी बेकायदेशीर रित्या शालेय प्रवेश फी घेतल्या जाते, शाळा सुटल्यावर बस वेळेवर उपलब्ध नसते याबाबतच्या समस्या, शाळेतील शिक्षण व्यवस्थापन, पोषण आहार व्यवस्थापन अशा अनेक समस्यांबाबत पालक वर्गाला शिक्षक व पाल्यासमोर चर्चा करायची होती. मात्र अचानक शाळेने एक दिवस तोंडी सांगून दुसऱ्या दिवशी मोजक्याच पालकांमधे टाकेद गावतील



राजकीय गावगुंडांच्या उपस्थितीत पालक मेळावा घेऊन टाकला. यात शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती सदस्य निवड करण्यात आली. या समितीत निवड केलेले जवळपास सर्वच सदस्य हे टाकेद गावातील कार्यकाळ संपलेले स्वयंघोषित 'झेरॉक्स' सरपंच व उपसरपंच यांच्या गटाचे असल्याने शाळेतील पालक मेळावा हा राजकीय गावगुंडांचा होता की काय असा प्रश्न इतरत्र अनुपस्थित पालक वर्गासमोर पडला आहे. इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत एकूण वीस तुकड्या आहेत. या वीस तुकड्यांमधून १२ सदस्य निवड करायचे होते. यात टाकेद ग्रामपंचायत वर प्रशासक असल्याने अध्यक्ष, उपाध्यक्ष पद राखीव जागा म्हणून रिक्त ठेवण्यात आले. शाळेत धामणगाव, अडसरे, भरविर, भंडारदरा वाडी, टाकेद, टाकेद खुर्द, वासाळी, सोनोशी, मायदरा, शिरेवाडी, बारशिगवे, खेड, परदेशवाडी, अधरवड, पिंपळगाव मोर, बेलगाव, धामणी, गंभीरवाडी, अडसरे खुर्द, बांबळेवाडी, घोडेवाडी अश्या जवळपास वीस ग्रामपंचायत व चाळीस वाड्या वस्त्यांमधून विद्यार्थी येत असतात. या शालेय समितीत १२ सदस्य निवडीमध्ये सहा महिला राखीव सदस्य आहेत. तर काही सदस्य शिक्षकांमधून घ्यायचे आहेत. अशा नियमावली नुसार प्रत्येक गाव ग्रामपंचायत वाडी वस्तीमधून किमान एक एक सदस्य निवड करत ही समिती बनवली जाते. मात्र असे न होता परस्पर मनमानी पध्दतीने पालक मेळाव्यात शालेय शिक्षण व व्यवस्थापन समिती वर एकाच ग्रामपंचायत हद्दीतील एकाच राजकीय गटाच्या पालकांची निवड करण्यात आल्याने टाकेद व परिसरातील सर्वच विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या समितीत कोणतीही राजकीय व्यक्तीचा समावेश नसावा व प्रत्येक गाव वाड्या वस्त्यांमधून एक एक सदस्य निवड करण्यात यावी, यासाठी हा अचानक घेतलेला पालकमेळावा होता. या मेळाव्यात निवड करण्यात आलेली समिती बरखास्त करून नव्याने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना किमान दोन दिवस अगोदर रीतसर लेखी नोटीस देऊन पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे व सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना पालक मेळाव्याला विद्यार्थ्यांसह अनिवार्य करावे, मतदान घेऊन किंवा लकी ड्रॉ काढत शांततेत समिती सदस्य निवड करण्यात यावी, शिक्षक पालक यांनाच अधिकार असल्याने कोणत्याही स्थानिक अथवा राजकीय लोकांना बोलविण्यात येऊ नये अशी मागणी टाकेद व परिसरातील पालकांनी शाळेकडे केली आहे.

### नव्याने शालेय समिती निवड करण्यात यावी

केवळ राजकीय गावगुंडांच्या वरदहस्ताला बळी पडून शाळेचे प्राचार्य शाळेचा निर्णय घेत असतील तर हे लोकशाही देशात हुकूमशाही पद्धतीने केलेला कारभार आहे. या शाळेत आजपर्यंत पोषण आहारात सुद्धा मोठा भ्रष्टाचार झाल्याचा स्थानिक ग्रामस्थ पालकांचा आरोप आहे. केवळ आम्ही नियमानुसार पालक मेळावा घेतला असे दाखवायचे, मात्र खरा पालक मेळावा हा फक्त आणि फक्त बोगस पोषण आहार घोटाळा करणाऱ्या स्थानिक गावगुंडांच्या स्वार्थासाठी शालेय समिती निवड करण्यासाठी तात्काळ घेण्यात आला. यात टाकेद गावचे कार्यकाळ संपलेले उपसरपंच रामचंद्र परदेशी व रतन बांबळे यांचा शालेय शिक्षण व व्यवस्थापन समितीशी काहीही एक संबंध नसतांना सुद्धा त्यांना या पालक मेळाव्याला बोलविण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या अध्यक्षतेखाली शालेय समितीत त्यांच्या गटातील पालकांची नावे घेऊन त्यांचीच मनमानी पध्दतीने निवड करण्यात आली.

